# भारतीय संघराज्यासमोरील प्रादेशिकतेचे आव्हान

प्रा. उदयकुमार. ना. लाड
श्रीपतराव चौगुले आर्ट्स अॅण्ड कॉमर्स कॉलेज माळवाडी – कोतोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

प्रस्तावना ः

भारतीय संघराज्यासमोरील प्रादेशिकतेचे आव्हान हा एक मोठा धोका आहे. आपल्या देशातील जनतेमध्ये विविध कारणांमुळे राष्ट्रावरील निष्ठेपेक्षा प्रादेशिक निष्ठा प्रबळ बनू लागल्या आहेत. आपला विशिष्ट प्रादेशिक विभाग किंवा प्रांत याविषयी तिला जास्त आत्मीयता वाटू लागली आहे. त्यातूनच प्रादेशिकवादाला प्रोत्साहन मिळू लागले आहे.

लोकांना आपल्या प्रांताविषयी किंवा प्रादेशिक विभागाविषयी आत्मीयता व अभिमान वाटणे यात गैर नाही. प्रत्येक व्यक्तीच्या मनात तिच्या कायमच्या वास्तव्याच्या प्रदेशाविषयी जवळीकीची भावना असणे स्वाभाविक समजले पाहिजे. राष्ट्रवादी व्यक्तीदेखील विशिष्ट मर्यादेपर्यंत प्रांतवादी असू शकते. तेव्हा लोकांना आपल्या प्रांताविषयी वाटणारी आत्मीयता हा चिंतेचा विषय होऊ शकत नाही. परंतु जेव्हा लोकांना आपल्या राष्ट्रापेक्षाही प्रांताविषयी अधिक जवळीक वाटू लागते तेव्हा मात्र त्या राष्ट्राच्यादृष्टीने नाजूक परिस्थिती निर्माण होते. जेव्हा एखाद्या प्रांतातील लोकांना इतर कोणत्याही निष्ठेपेक्षा आपल्या प्रांताविषयीची किंवा प्रादेशिक विभागाविषयीची निष्ठा अधिक महत्त्वाची वाटते, तेव्हा प्रदेशवादाचा जन्म होतो.

भारत हे एक विशाल संघराज्य असलेले राष्ट्र आहे. आज भारतात २९ घटराज्ये आणि ७ केंद्रशासित प्रदेश आहेत. यातील अनेक प्रांतांची निर्मिती करणे आवश्यक असते. ब्रिटीश कालखंडापासून अशी निर्मिती झाली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जनतेच्या आशा आणि आकांक्षा पूर्ण करण्यासाठी भाषावार प्रांत रचनेचे धोरण अवलंबिण्यात आले. त्यासाठी स्वतंत्र आयोग नेमण्यात आले. त्याप्रदेशातील जनतेला सर्वदृष्टीने सोयीचे व्हावे आणि त्या त्या प्रदेशातील बोलीभाषा, मातृभाषा ही प्रशासनाचीही भाषा व्हावी म्हणून भाषावार प्रांतरचनेचे धोरण स्वीकारले. प्रारंभीच्या काळात केंद्रशासनाने प्रांतरचना करताना आजच्यासारखे थोडेसे उदार धोरण ठेवलेले नव्हते. केंद्राच्या ताठर भूमिकेमूळे प्रांतरचना करताना नवीन प्रांताच्या निर्मितीसाठी आंदोलने झाली. प्रादेशिकवाद हा भारतीय राजकारणातला एक कळीचा (भांडणाचा) मुद्दा म्हणून नेमहीच चर्चेत राहिलेला आहे. ''दि फाऊंडेशन ऑफ न्यू इंडिया'' या ग्रंथात के. एम. पणीक्कर म्हणतात की, ''प्रादेशिकतेमुळे भारतीय लोकशाहीच्या समोर अनेक समस्या निर्माण झाल्या, राष्ट्रीय दुर्बलता निर्माण करणारा एक दुर्दैवी घटक म्हणजे प्रादेशिकता होय.' ह्या प्रादेशिकतेमुळेच केंद्र आणि घटक राज्यसरकारच्या संबंधावर विपरित परिणाम घडत आहेत.

भारताच्या राजकारणात दीर्घकाळ काँग्रेसपक्ष हा मध्यवर्ती होता. काँग्रेस व्यवस्था हे भारताच्या राजकीय प्रक्रियेचे वर्णन प्रचलित झाले. काँग्रेसच्या या मध्यवर्ती स्थानाला १९८९ नंतर धक्का बसला आणि वारंवार बहुपक्षीय सरकारे सत्तेवर आली. काँग्रेसच्या या उतरत्या कळेमुळे पूर्वी जे घटक राजकीय प्रक्रियेत क्षीण होते, त्यांचे महत्त्व वाढले. त्याचप्रमाणे नवे राजकीय पक्ष उदयाला आले. याच काळात नव्या सामाजिक शक्तीही राजकीयदृष्ट्या उदयाला आल्या. या स्थित्यंतरामुळे राजकीय प्रक्रियेत दोन घटक मध्यवर्ती बनले. ते म्हणजे प्रादेशिक पक्ष आणि जातीवर आधारीत राजकारण. खरे तर हे घटक पूर्वीही अस्तित्वात होतेच. पण आता त्यांचे राजकारणातील महत्त्व वाढले आणि नव्या स्वरुपात हे घटक क्रियाशील झाले आहेत. नवे राजकारण, प्रादेशिक पक्षांचा उदय, काँग्रेसचा ऱ्हास, संमिश्र मंत्रिमंडळांचे आघाड्यांचे राजकारण आणि भारतीय जनता पक्षाचा विस्तार हे सर्व मुद्दे एखाद्या साखळीप्रमाणे एकमेकांत गुंतलेले असून त्या सर्वांनी १९९० नंतरची राजकीय प्रक्रिया साकारली आहे.

भारताच्या राजकारणाचा रंगमंच आता दिल्ली हा राहिला नसून घटकराज्ये हा नवा रंगमंच उद्याला आहे. निवडणुकीतील स्पर्धा, निवड आणि वादविवाद हे प्रादेशिक संदर्भात होतात. यालाच राजकारणाचे प्रादेशिकीकरण असे म्हणता येईल. प्रादेशिकीकरणाचा संबंध एकूण पाच मुद्यांशी आहे.

१) राजकारणातील वादविवाद हे प्रदेशविशिष्ट आहेत. अखिल भारतीय विषय फारसे महत्त्वाचे न ठरता त्या-त्या राज्यातील विशिष्ट मुद्दे तिथल्या राजकारणात मध्यवर्ती ठरू लागले आहेत.

२) नेतृत्वाची जडणघडण राज्य पातळीवर होते. आता अखिल भारतीय नेत्यांचा फारसा प्रभाव न पडता प्रादेशिक नेतृत्व साकारताना दिसते. राज्यातील निवडणुका म्हणजे प्रादेशिक नेतृत्वाविषयीचा जनमताचा कौल असतात.

३) सामाजिक शक्ती याही प्रादेशिक सीमामध्येच अस्तित्वात येताना दिसतात. त्यामुळेच पक्षांचे आधार राज्या-राज्यात वेगळे असतात किंवा राज्य पातळीवरचे प्रादेशिक पक्ष निर्माण होतात.

४) निवडणुका, जनसंघटन या राजकीय प्रक्रियेत लोकांपुढील पर्याय हे प्रादेशिक पातळीवरच असतात.

५) राजकीय स्पर्धा राज्य पातळीवर होत असल्यामुळे त्या स्पर्धेच्या निष्पतीला प्रादेशिक संदर्भ असतात.

फाळणीमुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीचा विलक्षण प्रभाव संविदानकारांच्या मनावर असल्यामुळे त्यांनी ऐक्य, स्थैर्य व सुव्यवस्था या गोष्टींनाच प्राधान्य दिले होते. काहीही झाले तरी केंद्रसत्ता टिकून राहिलीच पाहिजे, त्यासाठी विविधतांना व मुक्ती राजकीय सहभागाला आळा घालावा लागला तरी तो घालणे आवश्यक आहे असा त्यांचा दृष्टीकोन होता. त्यानंतर सदैव स्वतंत्र भारतात 'ऐक्य' या एकाच मूल्याला कमालीचे महत्त्व राजकीय चिंतकांनी व क्रियावंतांनी दिले. स्वायत्ततेच्या कोणत्याही मागणीकडे इथे सतत संशयानेच पाहिले गेले. प्रादेशिकतेची भावना व राष्ट्रीयता यांचा मेळ या राज्यव्यवस्थेला कधीच घालता आलेला नाही.

भारतीय राज्यव्यवस्थेत प्रादेशिक भावनेचा अविष्कार पुढील प्रकारांनी झालेला दिसून येतो.

१. भाषावार प्रांतरचनेची मागणी २. स्वतंत्र राज्याचा दर्जा मिळण्यासाठी चळवळी

३. अनय प्रांतियांना प्रतिबंध ४. राज्यासाठी असंतुलन

५. प्रादेशिक असंतुलन ६. फुटीरतावादी चळवळी

भारतात १९७० पर्यंत लहान राज्यांचे प्रमाण कमी होते. पण त्यानंतर प्रादेशिक अस्मितेच्या चळवळींनी धरलेला जोर आणि राजकीय महत्त्वाकांक्षांना जातीच्या राजकारणाची मिळालेली जोड यामुळे लहान राज्यांच्या निर्मितीला पर्याय उरला नाही. आजही तेलंगणसारख्या प्रदेशात स्वतंत्र राज्याची मागणी केली जात आहे आणि त्याचा सकारात्मक पातळीवर विचार होत आहे. त्यामुळे लहान राज्याची निर्मिती यापुढच्या काळातही टाळता येणार नाही. पण या राज्यांचे जीवनमान सुरळीत होऊन त्यांच्या विकासाची गती वाढविल्यास तिथले अनेक प्रश्न सोडवण्यास हातभार लागू शकतो.

भारतातील प्रदेशवादाच्या वाढीस कारणीभूत झालेले प्रमुख घटक म्हणून धर्म, जात, भाषा, संस्कृती, भौगोलिक परिस्थिती, आर्थिक शोषण, शासन संस्थेने एखाद्या प्रदेशाची केलेली उपेक्षा इत्यादी घटकांचा उल्लेख करता येईल. एखाद्या प्रदेशात विशिष्ट धर्माचे, जातीचे किंवा भाषेचे लोक मोठ्या संख्येने एकवटले असतील तर त्या आधारे त्यांची प्रादेशिक अस्मिता जागृत केली जाऊ शकते. पंजाब, काश्मिर व ईशान्येकडील राज्ये यांच्यात धर्माच्या आधारे चालना दिली गेली आहे. भारतीय स्वातंत्र्योत्तर काळात अनेक विविध कारणांमुळे प्रादेशिक वाद निर्माण झाला आहे आणि हे वाद संघर्ष सोडविण्यासाठी केंद्र सरकारकडून वेळोवेळी प्रयत्न झाले.

आसामच्या डोंगरी प्रदेशातील जनतेची प्रादेशिक निष्ठा वेळोवेळी प्रकट झाल्यामुळे मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा, अरुणाचल ही राज्ये निर्माण करावी लागली आहेत. या डोंगरी प्रदेशातील जनतेने उग्र व हिंसक निदर्शने आंदोलने केली. त्यांची प्रादेशिक निष्ठा जबरदस्त होती. त्यामुळे केंद्रसरकारला त्यांना स्वतंत्र घटक राज्याचा दर्जा देणे भाग पडले. महाराष्ट्र–कर्नाटक सीमावाद अजूनही सुटला नसल्यामुळे मराठी व कन्नड भाषिकांची उग्र आंदोलने होताना दिसतात. महाराष्ट्रातील विदर्भ भागावर अन्याय झाला आहे. या समजुतीने महाविदर्भ संघर्ष समिती अधूनमधून डोके वर काढीत असतो. आंध्रमध्ये तेलंगणवाद्यांची प्रादेशिक निष्ठा जागृत झाली असून स्वतंत्र तेलंगणाची मागणी होत आहे. तेलंगणवाद्यांना आंध्रवाद्यांचे राजकीय व आर्थिक वर्चस्व नको आहे. पंजाबात अकाली दल (लोंगोवाल) फुटीर गट सातत्याने संघर्ष करीत असतो. दहशतवाद्यांनी पंजाबात धुमाकुळ घातला होता. आज पंजाब शांत झालेला असला तरी स्वतंत्र खलिस्तान राज्याची मागणी पुन्हा केव्हाही होईल हे सांगता येणार नाही. पंजाबची स्थिती राष्ट्रीय एकात्मतेला पूर्णपणे मारक ठरली आहे.

गुजरात, मध्यप्रदेश, राजस्थान, ओरिसा या राज्यातील काही भागांत प्रादेशिक अस्मिता जागृत झालेली दिसते. गुजरातमध्ये गुजरात व सौराष्ट्र असा संघर्ष चालू आहे. मध्यप्रदेशात महाकोशल, भोपाळ हे प्रदेश स्वतंत्र राज्याची मागणी करीत आहेत. राजस्थानात पूर्व राजस्थान व पश्चिम राजस्थान असा संघर्ष चालू आहे. आसाम ही पूर्वोत्तर भारतातील प्रदेशाची किल्ली आहे आणि ही किल्लीच जर हरवली, तर संपूर्ण पूर्वोत्तर भारत भारताच्या हातातून निसटू शकतो. आसाममध्ये उल्फाचा दहशतवाद हा उतरणीला असला तरी तो संपूर्ण संपलेला नाही आणि याची आठवण ही संघटना १५ ऑगस्ट व २६ जानेवारीच्या वेळी बॉम्बस्फोट करून आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देत असते. आजही 'बोडो' या आसाममधील आदिवासी जमातीकडून स्वतंत्र बोडोलँडची मागणी होत आहे. डाव्या चळवळीचा दबदबा टिकून असलेल्या मोजक्या राज्यांपैकी एक म्हणजे ईशान्य भारतातील त्रिपुरा होय. त्रिपुरात सर्वात मोठी समस्या आहे ती बांगलादेशातून होणाऱ्या घुसखोरीची. या घुसखोरीने या राज्याचा वांशिक व धार्मिक चेहराच बदलत चालला आहे.

ईशान्य भारतातील अस्थिरता, अशांतता आणि हिंसाचार हा केवळ बंदुकीच्या जोरावर संपुष्टात आणला जाऊ शकत नाही, तर त्यासाठी राजकीय तोडगाही गरजेचा असतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे मिझोराम. नावालाही फुटीरतावादी चळवळ अस्तित्वात नसलेले मिझोराम हे ईशान्य भारतातील कदाचित एकमेव राज्य असावे आणि हेच राज्य एकेकाळी फुटीच्या उंबरठ्यावर होते याचे आश्चर्य वाटते. परंतु जवळपास अडीच दशके बंदुकीच्या मार्गाने भारतापासून वेगळे होण्याची चळवळ मिझो नेत्यांनी चालविल्यावर त्यांना चळवळीतील फोलपणा कळून आला आणि केंद्र सरकारच्या नेत्यांशी चर्चा करण्यासाठी ते पुढे आले आणि मिझो नॅशनल फ्रंटचे नेते लाल डेंगा आणि तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्यात करारही झाला होता.

ईशान्य भारतातील फुटीरतावादी चळवळीची जननी असणारी नागांची चळवळ आता शांत झाली आहे आणि सहा वर्षापासून लष्कर आणि नागा संघटनामध्ये युद्धबंदी नांदत आहे आणि चर्चा सुरू आहे. ही चर्चा आता एका नाजूक टप्प्यातून जात आहे आणि नागा संघटनांनी 'महानागालँडची' मागणी पुढे रेटली आहे. महानागालँडमध्ये त्यांना अरुणाचल प्रदेश, आसाम व मणिपूरमधील नागाबहुल प्रदेशांचा समावेश करावयाचा आहे. मणिपूरमध्ये शिक्षणाचे प्रमाण भरपूर आहे. पण तिथे प्रादेशिक अस्मितेच्या चळवळीमुळे सुरक्षेचा प्रश्न धगधगत असतो. 'सेव्हन सिस्टर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या प्रदेशांच्या सीमा नेपाळ, बांगला देश, म्यानमारला लागलेल्या आहेत. त्यामुळे राजकीय अस्थैर्याप्रमाणे सीमांवरून चालणारा व्यापार, शस्त्रांस्त्रांची देवाण घेवाण याचा परिणाम म्हणून या राज्यांतील सर्व सामान्यांचे जीवन संघर्षमय बनले आहे.

प्रादेशिक अस्मिता आणि त्यातून निर्माण होणारी आंदोलने यांची परिणती मोठ्या राज्यांच्या विभाजनात व छोट्या राज्यांच्या निर्मितीत होत आहे. पश्चिम बंगालमध्ये गुरखा लिबरेशन फ्रंटने गुरखा जमातीची प्रादेशिक अस्मिता जागी करून स्वतंत्र गुरखा लँड या राज्याची मागणी केली आणि शेवटी १९८८ मध्ये केंद्र सरकार, पश्चिम बंगाल सरकार व गुरखा नॅशनल लिबरेशन फ्रंट यांच्यात करार होऊन गुरखा बहुसंख्य असलेल्या विभागाची 'दार्जिलिंग डोंगरी परिषद' स्थापना करून तिला पश्चिम बंगाल राज्यांतर्गत काही स्वायतत्ता देण्यात आली. दुसरीकडेही प्रादेशिक अस्मिता, वेगळेपणाच्या भावना व राजकीय पक्ष आणि नेते यांच्या राजकीय स्वार्थातून छत्तीसगढ, उत्तरांचल, झारखंड या नव्या राज्यांच्या निर्मितीची मागणी होत होती. शेवटी मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश व बिहार या राज्यांचे नोव्हेंबर २००० मध्ये विभाजन करण्यात येऊन छत्तीसगढ, उत्तरांचल व झारखंड या राज्यांची निर्मिती केली गेली. त्यातूनच महाराष्ट्रात ही स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी डोके वर काढू लागली आहे. एकूणच प्रदेशवाद राष्ट्रीय ऐक्याच्या भावनेला तडे पाडण्याचे कार्य करतो असे म्हणावे लागेल.

प्रत्येक लहान राज्याचा स्वत:चा वेगळा प्रश्न आहे. गोव्याच्या भौगोलिक रचनेमुळे बदलत्या काळाबरोबर राहून गोव्याने विकास केलेला दिसून येईल पण अन्य लहान राज्ये मात्र दुर्लक्षित आहेत. त्या जनतेसमोर जगण्याचा प्रश्न आहे. अशावेळी त्यांना विकासाच्या प्रवाहात आणावे लागेल. पण प्रत्यक्षात असे लक्ष पुरविले जात नाही. प्रत्येक राज्याचे प्रश्न काय आहे ते न पाहता मोघम योजना आखल्या जातात. बिहारमध्ये आदिवासीकडे दुर्लक्ष होत असे. त्यामुळे बिहारमधून झारखंडची झालेली निर्मिती आदिवासींच्या पथ्यावर पडेल असे चिन्ह आहे आणि व्यापक धोरण आखले गेले तरच या स्वतंत्र राज्याचे समर्थन करता येईल.

लहान राज्यांच्या निर्मितीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही पाठिंबा दर्शविला होता. पण त्याच काळात प्रजा समाजवादी पक्षाचा विरोध पत्करून अशोक मेहतांनी द्वैभाषिक महाराष्ट्राला पाठिंबा दिला होता. कारण गुजरात आणि महाराष्ट्र यांचे एक राज्य झाल्यास उत्तर प्रदेशशी स्पर्धा करणारे मोठे राज्य दक्षिणेत असेल अशी त्यांची भूमिका होती. त्या काळात मोठ्या राज्यांना अधिक पसंती दिली जात असे. सध्याचे चित्र मात्र त्याच्या अगदी विरुद्ध आहे.

प्रादेशिक अस्मितेशी निगडीत चळवळींच्या वाढणाऱ्या हिंसक कारवाया आणि राजकीय स्वार्थामुळे केंद्र सरकार लहान राज्यांना पाठिंबा देत आहे. लहान राज्यांची निर्मिती करावी का करू नये हा वादाचा मुद्दा आहे. कारण तत्कालीन परिस्थितीचा विचार करून केंद्र सरकार राज्यनिर्मितीचा निर्णय घेत असते. शेवटी एवढेच म्हणता येईल की, सध्या अस्तित्वात असलेल्या राज्यांचा कारभार कसा सुधारणार हा चिंतेचा प्रश्न आहे. लहान राज्यांचा प्रश्न गंभीर आहे.

प्रादेशिकता ही राष्ट्रीय एकात्मतेला घातक आहे. तेव्हा जनतेतील संकुचित भावना कमी करून त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना वाढीला लावली पाहिजे. प्रादेशिकता कमी करण्यासाठी नवीन राज्ये निर्माण करणे हा उपाय ठरण्याऐवजी अपाय ठरण्याची शक्यता आहे. साऱ्या देशात विघटनाचे राजकारण सुरू होईल. भारत हा फार मोठा देश आहे आणि या देशाची फुटीरवादी चळवळींशी लढण्याची शक्ती आणि जिद्दही अपार आहे आणि अशा मजबूत भिंतीला टक्कर देत राहिले तर या भिंतीच्या दगडांचे काही टवके उडतील परंतु आपलाच कपाळमोक्ष होईल याची दक्षता घेणे ही काळाची गरज आहे.

**प्रादेशिकवाद कमी करण्याचे उपाय :**

राष्ट्रीय जीवनामध्ये प्रादेशिकवादाची निर्मिती होणे हे चांगले लक्षण नाही. कारण त्यातून फुटीरतेच्या चळवळी निर्माण होतात व राष्ट्रीय एकात्मता धोक्यात येते. त्यासाठी प्रादेशिकवाद कमी करण्याचे उपाय खालीलप्रमाणे आहेत.

१. केंद्र सरकारने असे धोरण आखावे की, सर्व प्रदेशातील संस्कृतीचा संतुलित आर्थिक विकास झाला पाहिजे. ज्यामुळे वेगवेगळ्या प्रदेशात आर्थिक तणाव कमीत कमी निर्माण होईल.

२. सर्व प्रदेशातील लोकांना समान आर्थिक सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. ज्यामुळे अनावश्यक विरोध निर्माण होणार नाही.

३. भाषावादाचा प्रश्न लवकरात लवकर निकाली काढावा व सर्व प्रांतीय भाषांना समान दर्जा व मान्यता द्यावी.

४. हिंदी भाषा जबरदस्तीने कोणत्या भागावर, प्रदेशावर लादू नये. परंतु या भाषेचा प्रकार व प्रसार अशा पद्धतीने करावा की, लोकांनी स्वत:होऊन ही संपर्क भाषा म्हणून स्वीकारली पाहिजे.

५. केंद्रीय मंत्रीमंडळात सर्व प्रदेशांच्या नेत्यांना समान नेतृत्व मिळावे. जेणेकरून नेतृत्वासाठी पक्षपात होणार नाही. त्यामुळे केंद्र सरकारच्या नेतृत्वावर प्रांतीय लोकांचा विश्वास बसेल.

६. भारतीय संघराज्यातील केंद्र सरकार व राज्य सरकारे यांचे संबंध असे निर्माण करावे की, जेणेकरून त्यांच्यात असंतोष निर्माण होणार नाही. केंद्र व राज्यांनी एकमेकांना समजावून घेतले पाहिजे. प्रसंगी मदतही केली पाहिजेत. केंद्र व राज्य संबंधासाठी 'सरकारीया' आयोगाची निर्मिती केली. १९८७ मध्ये आयोगांनी आपला अहवाल सादर केला. त्या अहवालात केंद्र व राज्यामध्ये एक संतुलित धोरण निश्चित केले पाहिजे व राज्यांना अधिकची स्वायतता दिली पाहिजे असे मत मांडले.

**निष्कर्ष :**

भारतामध्ये स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सुद्धा प्रादेशिकवाद जटील रूप धारण करू लागला. प्रादेशिकवादाची भावना, फुटीरतेची भावना, देशाच्या एकतेला व अखंडतेला अडसर बनत आहे. भारतीय लोक प्रादेशिक भावनेला अधिक महत्त्व देत असून राष्ट्रीय भावनेला दुय्यम स्थान देत आहेत. राष्ट्रीय भावनेचा त्याग करीत आहेत.

१९५० पासून आजपर्यंत प्रादेशिकवादाची समस्या भारत सरकारला सळो की पळो करून सोडत आहे. ही फुटीरतेची भावना कोणत्याही देशासाठी हानीकारक आहे. फुटीरतेच्या चळवळीने वेळोवेळी हिंसक वळणही घेतले आहे. त्यासाठी आवश्यकता ह्या गोष्टींची आहे की, लोकांनी राष्ट्रीय भावनेचा स्विकार करावा व प्रादेशिकवादाच्या भावनेचा त्याग करावा. ह्यातच सर्वांचे भले आहे.

**संदर्भ सूची :**

१. प्राचार्य घांगरेकर चि. ग. , के. सागर : शासन आणि राजकारण भारताच्या संदर्भात तुलनात्मक राजनीतीसह, अनिरुद्ध पब्लिकेशन हाऊस, पुणे, २००३

२. प्रा. कुलकर्णी बी. वाय., प्रा. अशोक नाईकवाडे : भारताचे शासन आणि राजकारण, श्री विद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००३

३. प्रकाशबाळ, किशोर बेडकीहाळ (संपा.) : भारतीय राजकीय व्यवस्था, प्रक्रिया आणि स्वरुप, आंबेडकर अकादमी, सातारा, पहिली आवृत्ती २००२

४. डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे : भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, प्रथमावृत्ती जून २००३

५. दैनिक तरुण भारत, कोल्हापूर दि. ६ फेब्रुवारी २००५

६. प्रा. बी. बी. पाटील, प्रा. सौ. उर्मिला चव्हाण : भारतीय शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती जुलै २००४

७. दै. लोकमत, कोल्हापूर दि. ८-२-२००५

८. दैनिक तरुण भारत

९. योजना मासिक डिसेंबर २०१०